# साठीतील तरुणाचा खचलेल्या गावांना आधार!

संदीप आचार्य, मुंबई

## उत्तराखंडमधील ५ गावांत मदतीच्या गंगेचा अनवट प्रवाह





उत्तराखंडमध्ये दुर्गम गावांना डॉ. विलास आठवले यांनी मदत केली तेव्हा गावकऱ्यांचे चेहरे आनंदाने फुलले. या मदतीसाठी वाटा तयार करत खेचरांवरून माल वाहून न्यावा लागला.

**त्या दुर्गम** भागातील छोट्या गावांमध्ये मदत पोहोचविण्यासाठी कोणी नव्हते आणि खचलेल्या रस्त्यांमुळे तेथे जाण्याचा धोकाही कोणी पत्करण्यास तयार नव्हता. गुप्तकाशीहून पंधरा किलोमीटरवरील बांगरपट्टी या डोंगरी भागात खोड, डांगी, बक्सिर, भुनाल, मछोला आणि मथ्या या गावांपर्यंत पोहोचणे हाच मुळात चमत्कार होता. परंतु बेपत्ता झालेल्या वाटांनी मार्ग काढत जंगलातून डोंगरावरील गावांमध्ये पोहोचण्याचे आव्हान मुंबईतील ६२ वर्षांच्या एका जिद्दी माणसाने पेलले, आणि या पाच गावांना पुरेल एवढे अन्नधान्य व औषधांचे तेथे वाटपही केले.

मुंबईतील विल्सन महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक आणि 'सात्त्विक फाउंडेशन'चे डॉ. विलास आठवले यांच्यासाठी उत्तराखंड आणि चारधाम परिसर गेल्या चार दशकांपासून परिचयाचा आहे. येथील दुर्गम गावांमध्ये गेली अनेक वर्षे ते आरोग्य शिबिरे घेतात.

देशभरातून उत्तराखंडमध्ये मदत पोहोचत असली तरी ती शहरांच्या सीमेवरच संपत होती. डोंगरातल्या लहान गावांचा पत्ताही कोणाला नव्हता. आठवले यांनाही आपल्या गावांची परिस्थिती समजत नव्हती. खोड गावचे मुखीया बहुगुणा हे कसेतरी हृषीकेशपर्यंत पोहोचले आणि त्यांनी डॉ. आठवले यांना दूरध्वनीवरून मदतीची विनंती केली. त्यानंतर सुरू झाला तो मदतीचा महायज्ञ! त्यासाठी कित्येक टन गव्हाचे पीठ, तांदूळ, तेल, चहा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे औषधांचे साठे गोळा झाले. ही मदत गोळा होणे आणि उत्तराखंडमध्ये खचलेल्या डोंगरकड्यांमध्ये पायवाट तयार करत-करत अवघ्या १९ खेचरांच्या मदतीने पंधरा फेऱ्या मारून ती डोंगरांमध्ये अडकलेल्या गावांमध्ये कशी पोहोचली, हीसुद्धा एक चित्तरकथाच आहे!

तेथील गावांची परिस्थिती कळताच डॉक्टरांनी आपल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून मुंबईतच आवश्यक ती औषधे गोळा करून हरिद्वारमधील स्वामी देवानंद सरस्वतींच्या आश्रमात पाठवून दिली आणि डेहराडूनचे विमान पकडले. विलेपार्ले येथील संन्यासाश्रमाचे महामंडलेश्वर स्वामी विश्वेश्वरानंद, हरिद्वार येथील स्वामी देवानंद सरस्वती, आर्य निवासचे रमेशभाई यांनीही सामग्री दिली. आता ही मदत त्या गावांमध्ये पोहोचविण्याचे अग्निदिव्य बाकी होतं!

लोकसत्ता चांगभलं

मदत नेण्यासाठी ट्रकची शोधाशोध सुरू झाली. हरिद्वारहून छेंदागडपर्यंत येण्यास कोणी ट्रकवाला तयार नव्हता, कारण रस्ते कधीही कोसळू शकतील याची भीती होती. अखेर दोन ट्रकवाले व एक जीपचालक जास्त पैसे घेऊन तयार झाले. चिखलाच्या रस्त्यातून एक तासाचे अंतर कापण्यासाठी सुमारे आठ तास लागले. तेथून पुढे ही सर्व मदत खेचरांवल लादून नेण्याचे ठरले. १९ खेचरांच्या पंधरा फेऱ्या करून चार दिवसांत सर्व सामान खोडा गावात नेण्यात आले.

वाटेतही अनेक गरजूंना मदत केली गेली आणि मुख्य म्हणजे वाटेवरील काही गावांतील डॉक्टरांनाही औषधांचे वाटप केले. चालताना जळवा पायाला चिकटून रक्त काढत होत्या तर चिखलाच्या रस्त्यातून वाट काढताना तारांबळ उडत होती. परंतु एका जिद्दीने डॉ. आठवले या पाच गावांमध्ये गेले व तेथील अडीचशे कुटुंबांना प्रत्येकी २५ किलो तांदूळ, गव्हाचे पीठ, तेल, डाळ, मसाला व चहाची पावडर आदी सामग्री दिली. ज्यांच्या घरातील कर्त्या पुरुषाचे निधन झाले त्यांना जादा सामग्रीचे वाटप करण्यात आले तेव्हा गावकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. एका समाधानाने डॉ. विलास आठवले मुंबईत आले ते पुढील टप्प्यात तेथील शाळांना सतरंज्या तसेच अन्य शैक्षणिक साहित्य पाठविण्याचा निश्चय करून.

(सात्त्विक फाउंडेशनच्या संपर्कासाठी- विजय लिमये, पराग फडके, मोबाइल क्र. ९८९२२३४९१८ किंवा ९८२१३४६२२०)